स्वर्गीय यशवंराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री यांचे स्मरणार्थ त्यांचे सातारा जिल्हयात भव्य स्मारक उभारण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक-स्मारक-२०१७/प्र क्र २५४/योजना-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३१ जानेवारी, २०१८

वाचा:-

(१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९, दि. ११ ऑगस्ट, २०१६.
(२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. बैठक(स्मारक)-२०१६/ प्र.क्र.१०५/ पंरा-९, दि. ३१ मार्च, २०१७.
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २०.०४.२०१६
(४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.०७/कोषा-प्र-५, दि.१०.०५.२०१६

प्रस्तावना:-

मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी विधानमंडळाच्या अधिवेशनात सन २०१५-१६ आश्वासन क्र. ५५९- स्वर्गीय यशवंराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री यांचे स्मारकाबाबतही विचार केला जाईल,असे आश्वासन दिले होते. त्यानुषंगाने नियुक्त केलेल्या जिल्हाधिकारी, सातारा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि.७.३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये, स्मारक बांधकाम आराखड्याबाबतचा रु.९०३.०७ लाख (अक्षरी रुपये नऊ कोटी तीन लाख सात हजार फक्त) इतक्या किमंतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरिता सादर केला होता.

सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमती करिता सादर केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव तपासून रुपये ८४७.३७ लाख (अक्षरी रुपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख सदतीस हजार फक्त) इतक्या प्रकल्प किंमत व अंदाजपत्रकास काही अटीशर्तीच्या अधीन राहून सहमती दर्शविली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

शासन निर्णय:-

स्वर्गीय यशवंराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री यांचे सातारा जिल्ह्यात स्मारक बांधकामासाठी रुपये ८४७.३७ लाख (अक्षरी रुपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख सदतीस हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या आराखडे व अंदाजपत्रकांना उच्चस्तरीय सचिव समितीच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर स्मारकाच्या बांधकामाच्या आराखडयास सार्वजनिक बांधकाम विभागाने खालील प्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

अ) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१४/प्र.क्र.९६/इमा-३, दि.०८/०७/२०१४ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ब) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) काम सुरु करण्यापूर्वी सदर नकाशे व अंदाजपत्रकावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे व उपभोक्त विभागाचे सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

इ) काम सुरु करण्यापूर्वी इमारतीचा सविस्तर आराखडे व नकाशे तयार करुन शासकीय मुख्यवास्तुशास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

३. ग्राम विकास व जलसंधाण विभाग शासन निर्णय क्र.स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ मधील परिच्छेद-३ (३) अन्वये शासकीय निधीतून शासकीय जागेवर स्मारक उभारण्यात यावे अशी स्पष्ट तरतूद आहे. तथापि, स्वर्गीय यशवंराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री यांचे स्मारक बांधकाम सुरु करण्यापूर्वी स्मारकाची जागा शासनाच्या किंवा जिल्हा परिषद यांच्या नावे हस्तांतरित करुन घेण्यात यावी. या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर खर्च हा लेखाशिर्ष-मागणी क्रमांक-एल-३, २०१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम, १९६ जिल्हा परिषदांना / जिल्हास्तरीय पंचायतीना सहाय (००) (०६) थोर व्यक्तींची स्मारके उभरण्याकरिता विशेष कार्यक्रम (राज्यस्तर) (२५१५२४८६), ३१ सहायक अनुदान (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये रु. ७६९.२० लाख (रुपये सात कोटी एकोणसत्तर लाख वीस हजार फक्त) इतका निधी यापूर्वीच वितरीत करण्यात आला आहे. सबब सदर रकमेचे उपयोगीता प्रमाणपत्र व कामाची प्रगती विचारात घेऊन उर्वरीत निधी वितरीत करण्यात येईल.

५. उपरोक्त निधीतून खर्च करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच मुख्य वित्त व लेखा अधिकारी,जिल्हा परिषद, सातारा यांना आहरण संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी स्मारकाच्या कामाची प्रगती तसेच निधी उपयोगिता संबंधिची माहिती, उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी शासनास सादर कावी व महालेखापालांच्या लेख्याशी खर्च मेळाबाबतची कार्यवाही करावी.

७. सदर स्मारकाच्या बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्मारक समितीची राहील.

८. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७७९/१७/इमा-३, दिनांक २३.०३.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१८०२०२११४०२१९७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manoj D Jadhav

Digitally signed by Manoj D Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, cn=Manoj D Jadhav
Date: 2018.02.03 17:56:48 +05'30'

(मनोज जाधव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा मंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.).यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मंबई
१२.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे
१३.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
१५.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद , सातारा
१६.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा

१८. नियोजन विभाग (का.१४७४/१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१९.वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई ३२.
२०.कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
२१. निवड नस्ती (का.यो-६). ग्राम विकानस व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.